# अंतिम वर्ष परीक्षा उद्यापासून

## विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ७४ हजार विद्यार्थी; २०० अभ्यासक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने बुधवार (दि. २१) पासून अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या परीक्षांना सुरुवात होणार आहे. २०० हून अधिक अभ्यासक्रमांसाठी सुमारे ७४ हजार विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

परीक्षा विभागाकडून अंतिम वर्ष शेवटचे सत्र परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ई-मेल व एसएमएसच्या द्वारेयूजरआयडीवपासवर्डपाठविण्याचे काम सुरू आहे. ऑफलाईनपरीक्षेसाठी संलग्नित महाविद्यालयांना ई-मोडमध्ये प्रश्नपत्रिका वितरण करण्यासाठीची संगणक प्रणाली तयार करण्यात आली आहे. याबाबतची माहिती मंगळवारी प्राचार्यांना देण्यात येणार आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

ऑफलाईन परीक्षेच्या अनुषंगाने सांगली, सातारा व कोल्हापुरातील जिल्हा प्रशासनास महाविद्यालये सॅनिटाईज करण्याबाबतची विनंती पत्रे विद्यापीठाने पाठविली आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालये प्राचार्यांची परीक्षा विभागाच्या वतीने बैठक घेण्यात आली. परीक्षेवेळी विद्यार्थ्यांना आवश्यक पायाभूत सुविधांबरोबर ऑनलाईन परीक्षेसाठी संगणक लॅब, वायफायची व्यवस्था करून द्यावी. महाविद्यालयात परीक्षेसाठी समुपदेशक व हेल्पलाईन क्रमांक देण्यात यावा, अशा सूचना करण्यात आल्या आहेत. अंतिम वर्षाची परीक्षा देताना विद्यार्थ्यांनी त्रास करून घेऊ नये. परीक्षेवेळी अडचणी निर्माण झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेची पुन्हा संधी दिली जाईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

### ऑनलाईन-ऑफलाईन परीक्षा

अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या बी.ए., बी.कॉम., बी,एस्सी., एम.ए., एम.एस्सी., बी.व्होक, बी.ए.बीएड., अभियांत्रिकी यासह डिप्लोमाच्या परीक्षा बुधवारपासून सुरू होतील. ५२ हजार विद्यार्थी ऑनलाईन तर २२ हजार विद्यार्थी ऑफलाईन परीक्षा देणार आहेत.

# विद्यापीठ कायद्यात सुधारणांसाठी समिती

**मुंबई :** राज्यपाल आणि कुलपती भगतसिंह कोश्यारी, लोकप्रतिनिधी आणि विद्यार्थी संघटनांनी केलेल्या मागणीनुसार राज्य शासनाने उच्च शिक्षणाचा राज्यातील दर्जा सुधारण्यासाठी तज्ज्ञ समिती विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी स्थापन केली.

या समितीमध्ये शिवाजी विद्यापीठ; कोल्हापूरचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. राजन वेळुकर, डॉ. विजय खोले, माजी कुलगुरु डॉ. बी. टी. साबळे, माजी प्र-कुलगुरु डॉ. नरेशचंद्र, ॲड. हर्षद भडभडे, पुणे विद्यापीठाच्या विधी अधिकारी परवीन सय्यद, प्राध्यापक डॉ. रचित राथो, शीतल देवरुखकर शेठ, प्रा. प्रसाद दोडे यांचा सदस्य म्हणून समावेश आहे.

# विद्यापीठ अधिनियमात दुरुस्तीसाठी

# उच्चस्तरीय समिती गठित

■ कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचा समावेश; अंतरिम अहवाल तीन महिन्यात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सुधारणा करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्यावतीने राज्यस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. यात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी.शिर्के यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जागतिकीकरणाच्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण मिळणे आवश्यक आहे. यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावणे, गुणवत्ता वाढविणे, त्यांचे बळकटीकरण करणे गरजेचे आहे. राज्यपाल, विविध लोकप्रतिनिधी व विद्यार्थी संघटना यांच्याकडून विद्यापीठाच्या अधिनियमात दुरुस्ती करण्याबाबत मागणी करण्यात येत होती. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये कामकाज करताना विद्यापीठ, महाविद्यालये यांना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांनी केलेल्या नवीन शैक्षणिक सुधारणा आदी बाबी तपासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमात सुधारणा करणे गरजेचे आहे. यासाठी राज्य शासनाने समिती गठीत करण्यास मान्यता दिली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली १४ सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे.

# जिल्ह्यात तीन नवीन महाविद्यालये

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने कोल्हापूर जिल्ह्यात बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट या पारंपरिक अभ्यासक्रमाची नवीन तीन महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता दिली आहे. यावर्षीपासून या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. यात ज्ञानसागर बहुदेशीय संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कोनोली तर्फ असंडोली (पो. गारिवडे, ता. राधानगरी), डॉ. तानाजीराव चोरगे कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय नंदवाळ (ता. करवीर), जेनेसिस कॉलेज हॉटेल मॅनेजमेंट, मौजे सोन्याची शिरोली (ता. राधानगरी) यांचा समावेश आहे.

# तीन नव्या महाविद्यालयांना शिवाजी विद्यापीठाची मान्यता



कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठांतर्गत तीन नव्या महाविद्यालयांना आज परवानगी देण्यात आली.

बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांची ही महाविद्यालये असून या वर्षीपासून तेथे अध्यापन सुरू होईल. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या बैठकीत ही मान्यता दिली. विद्यापीठाने बृहत आराखड्याअंतर्गत काही वर्षांत नवीन महाविद्यालये सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव मागविले होते. आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाने हे प्रस्ताव शासनास सादर केले. त्यानंतर या वर्षी तीन नवीन महाविद्यालये सुरू करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. यात ज्ञानसागर बहुद्देशीय संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोनोली तर्फ असंडोली (पो. गारिवडे ता.राधानगरी), डॉ. तानाजीराव चोरगे कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, नंदवाळ (ता. करवीर), जेनेसिस कॉलेज हॉटेल मॅनेजमेंट, मौजे सोन्याची शिरोली (ता. राधानगरी) यांचा समावेश आहे.

विद्यापीठसंलग्न महाविद्यालयांना पाठविण्यात येणारी परिपत्रके व इतर शैक्षणिक माहिती या महाविद्यालयांना पाठविण्यात यावी, असे पत्रक संलग्नता विभागाचे उपकुलसचिव विलास सोयम यांनी काढले आहे.